◇ जनस्थान ◇ माझं ग्रंथालय ◇ कुसुमाग्रज अभ्यासवृत्ती
◇ गोदावरी गौरव ◇ ग्रंथ तुमच्या दारी ◇ संगीत अभ्यासवृत्ती
◇ साहित्यभूषण ◇ पाथेय (त्रैमासिक) ◇ संगीत स्पर्धा

**कुसुमाग्रज प्रतिष्ठान**
कुसुमाग्रज स्मारक
गंगापूर रोड,
नाशिक ४२२०१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२५३) २५७६१२५

नाशिक १७/११/२०१८

महोदय,

सस्नेह नमस्कार

मराठी साहित्य क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर ठसा उमटविणा-या, मराठी भाषेतून गौरवास्पद ललितलेखन करणाऱ्या साहित्यिकाला जनस्थान पुरस्कार देऊन कुसुमाग्रज प्रतिष्ठान सन्मानित करते. एक वर्षाआड दिल्या जाणाऱ्या 'जनस्थान' पुरस्काराचे स्वरुप एक लक्ष रुपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे आहे.

२७ फेब्रुवारी २०१९ रोजी दिल्या जाणाऱ्या '१५ व्या' जनस्थान पुरस्कारासाठी योग्य साहित्यिकाची निवड चोखंदळपणे व्हावी, या हेतूने निवड कार्य विविध स्तरांवर केले जाते. त्यासाठी नामवंत समीक्षक, साहित्यिक आणि जाणकार वाचकांचे सहकार्य आम्हाला हवे आहे. आपला व्यासंग, साहित्यासंबंधीची निकोप दृष्टी रसज्ञता लक्षात घेऊन आपणास ही विनंती करीत आहोत.

यापूर्वी जनस्थान पुरस्काराने - विजय तेंडुलकर - १९९१, विंदा करंदीकर- १९९३, इंदिरा संत - १९९५, गंगाधर गाडगीळ - १९९७, व्यंकटेश माडगूळकर - १९९९, श्री ना. पेंडसे - २००१, मंगेश पाडगावकर - २००३, नारायण सुर्वे - २००५, बाबुराव बागुल - २००७, ना. धों. महानोर - २००९, महेश एलकुंचवार-२०११, भालचंद्र नेमाडे-२०१३, अरुण साधू-२०१५, विजया राजाध्यक्ष-२०१७ यांना सन्मानित करण्यात आले आहे.

आपल्यामते या पुरस्काराला सर्वस्वी योग्य असणाऱ्या तीन साहित्यिकांची नावे आपल्या पसंतीक्रमानुसार दिनांक ३१ / १२ /२०१८ च्या आत टपालाने किंवा kusumagraj.p@gmail.com ह्या ईमेलवर पाठवावीत ही विनंती. अंतिम निवड जनस्थान पुरस्कार निवड समिती करेल.

कळावे.

आपला

विलास लोणारी
अध्यक्ष
जनस्थान पुरस्कार प्रबंधक समिती

अध्यक्ष - **मधु मंगेश कर्णिक**, उपाध्यक्ष - **संजय पाटील**, कार्यवाह - **मकरंद हिंगणे**, कोषाध्यक्ष - **डॉ. विनय ठकार**, सहकार्यवाह - **अरविंद ओढेकर**
सदस्य : **विनायक रानडे, डॉ. कुणाल गुप्ते, अशोक हांडे, गुरुमितसिंग बग्गा, अरुणा ढेरे, महापौर, नाशिक** - पदसिद्ध

Email : kusumagraj.p@gmail.com Website : www.kusumagraj.org